# मेट्रो-३ मार्गिकेचे ८०० मीटर भुयारीकरण

**सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. १५ : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ मार्गिकेच्या भुयारीकरणाचे काम वेगाने सुरू आहे. आतापर्यंत सुमारे ८०० मीटर मार्गिकेचे काम पूर्ण झाले आहे. टीबीएम मशीनच्या साह्याने दिवसाला सुमारे १० मीटरपर्यंत भुयारीकरण करण्यात येत असल्याची माहिती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या अधिकाऱ्यांनी दिली.

मेट्रो-३ मार्गिकेचे भुयारीकरण करण्यासाठी टनेल बोरिंग मशिन्स (टीबीएम)चा वापर केला जात आहे. या मार्गिकेच्या विविध टप्प्यांमध्ये टीबीएम मशीन्सद्वारे भुयारीकरणाच्या कामाला सुरुवात झाली आहे. या मार्गिकेचे काम सात टप्प्यांमध्ये होणार असून, १७ टीबीएम मशीन या कामी वापरण्यात येणार आहेत. सध्या सहा टीबीएमच्या साह्याने भुयारीकरणाचे काम सुरू असून, उर्वरित टीबीएम मशीन लवकरच वापरल्या जातील, असे एमएमआरसीचे प्रकल्प संचालक एस. के. गुप्ता यांनी सांगितले. दीड वर्ष प्रकल्पाच्या दृष्टीने निर्णायक ठरले. या दरम्यान प्रकल्पासाठी आवश्यक असणारी जमीन अधिग्रहण करणे, वाहतूक व्यवस्थापन आराखड्याची अंमलबजावणी करणे, स्थानकाचे डिझाईन ठरवणे, भूमिगत वाहिन्यांचे स्थलांतरण करण्याची कामे पूर्ण करण्यात आली आहेत, असेही या वेळी गुप्ता यांनी सांगितले.